'SANMITRA' Regd. 1779/57
Postal Regd. No. Tech/47-259/MBI/2003-05

# दैनिक सन्मित्र

वर्ष ५५ वे अंक क्र. ३५४ सोमवार, दिनांक १८ ऑक्टोबर २००४ (पृष्ठे ४ किंमत १ रुपया)

## वास्तुशास्त्राचे 'पेटंट' एक जर्मन कंपनीकडे

### सुप्रसिध्द वास्तुशास्त्राचे अभ्यासक डॉ. रविराज अहिरराव यांनी दिलेली माहिती

ठाणे, दि. १८ - वास्तुशास्त्राचे आद्य प्रवर्तक विश्वकर्मा असून मानवी शरीर व निसर्ग यांचे योग्य संतुलन साधण्यासाठी वास्तुशास्त्राची आवश्यकता आहे. वास्तुशास्त्राचा उगम जरी भारतात झाला असला तरी भारतात यावर पुस्तके [illegible]त. परदेशात यावर बरेच वाङ्मय उपलब्ध आहे. सध्या वास्तुशास्त्राचे 'पेटंट' एक जर्मन कंपनीकडे असून ते मिळविण्यासाठी आपणास संघर्ष करावा लागेल असे आवाहन सुप्रसिध्द वास्तुशास्त्राचे अभ्यासक डॉ. रविराज अहिरराव यांनी ठाणे जनता सहकारी बँकेच्यावतीने आयोजित केलेल्या ''तुमचे घर वास्तुशास्त्राच्या दृष्टीने योग्य आहे का ?'' या विषयावर बोलताना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष स. गं. जोशी हे होते.




*आपले घर वास्तुशास्त्रानुसार योग्य आहे का ? या कार्यक्रमप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असलेले डावीकडून बँकेचे सरव्यवस्थापक र. ग. कर्वे, प्रमुख वक्ते डॉ. रविराज अहिरराव, सौ. मंजुश्री अहिरराव व बँकेचे अध्यक्ष स. गं. जोशी.*

कार्यक्रमाच्यावेळी 'तथास्तु' ही गृहकर्ज योजना व 'कवचकुंडल' विमा संरक्षण अशा दोन योजनांचा शुभारंभ बँकेचे अध्यक्ष स. गं. जोशी यांच्या हस्ते करण्यात आला.

'तथास्तु' गृहकर्ज योजनेंतर्गत कर्जदारास डॉ. रविराज अहिरराव यांचा वास्तुशास्त्र विषयक मोफत सल्ला देण्यात येईल. 'कवचकुंडल' योजनेंतर्गत कर्जदारांच्या कर्जासाठी विमा संरक्षण आहे. या दोनही योजनांची सविस्तर माहिती बँकेचे मुख्य व्यवस्थापक श्रीकृष्ण म्हसकर यांनी करून दिली. (पान ३ पहा)

आपल्या कर्जदार ग्राहकांस वास्तुशास्त्राविषयी मार्गदर्शन देऊन कर्जवितरण करणाऱ्या देशातील अत्यंत मोजक्या बँकांत ठाणे जनताचा समावेश असल्याचे डॉ. रविराज अहिरराव यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस बँकेचे सरव्यवस्थापक रविंद्र कर्वे यांनी सर्वांचे स्वागत करून बँकेविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष स.गं. जोशी यांनी केले.

प्रमुख अतिथींचा परिचय मुख्य व्यवस्थापक दिलीप वेलणकर यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन विकास व्यवस्थापिका सौ. अपर्णा कुंटे यांनी केले.

कार्यक्रमासाठी ठाणे भारत सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. य. गोखले, बँकेचे अनेक संचालक, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी या विषयाच्या जिज्ञासुंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. १००० हून अधिक ठाणेकर नागरिकांनी कार्यक्रमासाठी हजेरी लावली.